# विधानसभा निवडणूक आणि विदर्भ

डॉ. रविंद्र भणगे, प्राद्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

.......................................................................................................

गेल्या वेळी भाजपच्या पारडयात भरभरून मतांचे दान टाकणाऱ्या वैदर्भीय मतदारांनी या वेळी मात्र भाजपला जोरदार झटका दिला आहे. मतदारांचा हा कौल भाजपच्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आह. मोठा जनाधार असलेल्या नितीन गडकरींना बाजूला सारणे, तेली तसेच ओबीसी समाजाची नाराजी भाजपला भोवल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. कॉंग्रेसला विदर्भात कमी जागा मिळाल्या असल्या तरी या पक्षाच्या मतांमध्ये भरघोस वाढ झाली आहे. कॉंग्रेसने ही निवडणूक थोडी गांभीर्याने घेतली असती तर चित्र आणखी वेगळे दिसले असते. राज्यातील सत्ता स्थापनेचा मार्ग विदर्भातून जातो ही उक्ती सार्थ ठरवत भाजपने गेल्या वेळी विदर्भातून ६२ पैकी ४४ जागा स्वतंत्रपणे लढून जिंकल्या होत्या. या वेळी युती पन्नासचा आकडा गाठेल, असा दावा भाजपकडून सातत्याने केला जात होता. जनतेने तो फोल ठरवला आहे. भाजपला येथे निम्म्या जागासुध्दा जिंकता आल्या नाहीत. नागपूर जिल्हा हा भाजपचा गड म्हणून ओळखला जातो. या वेळी कॉंग्रेसने या गडालाच सुरूंग लावला आहे. शहरातील दोन जागा कॉंग्रेसने हिसकावल्या, तर नागपूर ग्रामीणमध्ये भाजपची पार वाताहत झाली. खुद्द मुख्यमंत्र्यांना त्यांच्या मतदारसंघात गेल्या वेळचे मताधिक्य राखता आले नाही. ग्रामीणचे नेतृत्व करणारे चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी नाकारणे भाजपला चांगलेच महागात पडले. भंडारा—गोंदियाची जबाबदारी नागपूरच्या परिणय फुकेंकडे देणे ही घोडचूक होती, हे तेथील निकालातून दिसून आले. गडचिरोलीत भाजपने बऱ्यापैकी यश मिळवले पण सुधीर मुनगंटीवारांच्या चंद्रपुरात भाजपला मोठा फटका बसला. गेली अनेक वर्षे कॉंग्रेसचा गड असलेल्या यवतमाळात भाजपने गेल्या वेळी निर्भेळ यश मिळवले होते. या वेळी कॉंग्रेसने तेथे पुन्हा वर्चस्व प्रस्थापित केले आहे. राज्यमंत्री मदन येरावार यांचा निसटता विजय झाला आहे. वर्ध्यात गेल्या वेळचेच उमेदवार रिंगणात होते. तेथे कॉंग्रेसची कामगिरी ढेपाळली. अमरावतीत या वेळी कॉंग्रेसने अधिक जागा जिंकत युतीला धक्का दिला आहे. प्रहारचे बच्चू कडू यांनी मेळघाटमध्ये पक्षाला विजय मिळवून देत प्रहार संघटनेला बळकटी दिली. गेल्या पाच वर्षांत भाजपने विदर्भात विकास कामे करताना वऱ्हाडाकडे कमालीचे दुर्लक्ष केले. त्याचा फटका अमरावतीत बसला, पण अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्हयात मात्र भाजपने या वेळीसुध्दा चांगले यश मिळवले. विकासकामे व निवडणुकीतील विजय याचा फारसा संबंध नसतो, हे पश्चिम वऱ्हाडातील या यशाने दाखवून दिले. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणूकीत विदर्भात कॉंग्रेसला केवळ एक जागा मिळाली होती, पण पक्षांच्या मतांमध्ये प्रचंड वाढ झाली होती. हा धोका भाजपला ओळखता आला नाही. त्याचा फटका आता बसला आहे. या वेळीसुध्दा कॉंग्रेसने जागा कमी जिंकल्या, पण पक्षाच्या मतांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. नागपूर शहरात भाजपला काही ठिकाणी काठावर विजय मिळाला.

लोकसभा निवडणूक झाली, तेव्हा महाराष्ट्राने युतीच्या पारड्यात भरभरुन मते टाकली. उमेदवार कोणीही असला, तरी परत नरेंद्र मोदी यांना निवडून द्यायचे आहे, या विचाराने हे मतदान झाले. तरीही बऱ्याच लोकांना मतदार राजाचा अंदाज आला नाही.

मोदी यांना परत सत्ता मिळविणे अवघड आहे, असे भाकीत बहुतांश लोक करत होते. फक्त भाजपने दोनशेचा आकडा गाठला तरी पुरे, असेही सांगितले जात होते. प्रत्यक्षात भाजपने तीनशेपार झेंडा रोवला आणि युतीने साडेतीनशेपार. तोच कल विधानसभेतही असेल, असे राज्यातील भाजप नेतृत्वाला वाटले होते. त्यावरुनच, काँग्रेस—राष्ट्रवादी आता संपली, आता आपलेच राज्य, असा भ्रम निर्माण झाला. पण यंदा नरेंद्र यांना जे जमले, ते देवेंद्र यांना जमले नाही.

महाराष्ट्रात गेल्या वेळी २६० जागा लढविणाऱ्या भाजपने यंदा युतीमुळे १६४ जागा लढवल्या, कमीच जागांवर विजय मिळाला, पण तरीही मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत फारच कमी घट झाली. २०१४ विधानसभा निवडणूक:३१.१५ टक्के मते; ताजी विधानसभा निवडणूक: २५.७० टक्के मते झालेली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपची मते अवाच्या सव्वा वाढली होती. त्यावर विसंबून राहणे हे भाजपला यश आणि जनाधाराची सुरक्षितता याविषयीच्या अवास्तव कल्पनांकडेच नेणारे ठरणार, यात शंका नव्हती. ती अवास्तव सूज उतरविण्याचे काम या विधानसभा निवडणुकीने केले असून २०१४ मध्ये जी स्थिती होती, तेथे राजकारणाला नेऊन ठेवले आहे.

विधानसभा निवडणुकीत भाजप—शिवसेना महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी विरोधकांच्या पारड्यात ३० ते ४० जागाच पडतील या सत्ताधाऱ्यांच्या फाजील आत्मविश्वासाला जनतेने जोरदार दणका दिला आहे. युतीला ‘महा’ नव्हे तर केवळ ‘जनादेश’ देऊन महाराष्ट्राच्या जनतेने राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाच्या पारड्यात १०० च्या आसपास जागा टाकून राज्याला एक सशक्त विरोधी पक्ष देण्याचे काम केले आहे.

विदर्भातील एकूण ६२ जागांवर छाप टाकण्यात भाजपला यश आले नाही. ‘अस्तित्वच नाही’, असे म्हणून थट्टेचा विषय बनलेल्या विरोधी पक्षाने भाजपच्या गडाला यंदा चांगलेच धक्के दिले. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या अनुभवाचा दबदबा या प्रचारात विदर्भाने बघितला. विकासापेक्षाही जातीय समीकरणे मोठी ठरण्याचे दुदैवी वास्तव विदर्भातही झळकलेच. विदर्भात ना मोदी लाट चालली, ना कर्जमाफी, मतदार समृध्दी महामार्गाला भाळले नाहीत. ‘कलम ३७०’ ची भुरळही त्यांना पडली नाही. वेगळया विदर्भाचेही मतदारांनी सोयीस्कर विस्मरण केले. लोकसभा निवडणुकीत दहापैकी नऊ जागांवर विजयी पताका फडकवणाऱ्या भाजपच्या या वेळी १५—१६ जागा कमी झाल्या. ‘शत प्रतिशत’ चा नारा नाकारण्याचे काम विदर्भात झाले. १५ जागांवर विजय मिळाल्याने काँग्रेसमध्ये नवचैतन्य आले. जागा निश्चित करताना अनेक नेते व गटांना त्यांच्या क्षेत्रात व्यस्त करुन काँग्रेसने थोडेफार ‘डॅमेज कंट्रोल’ केले. रुसवे—फुसवे विसरुन एकसंधतेने काम केले असते, तर भाजपच्या जागा निम्म्याहून कमी झाल्या असत्या, ही काँग्रेस कार्यकर्त्यांची भावना निकालानंतर बोलकी झाली.

विदर्भात १५ जागा काँग्रेसला मिळाल्या. मित्र पक्षांना आठ जागांवर विजय मिळाला भाजपला बासष्ट जागा लढविताना दमछाक झाली. फडणवीस सरकारने विदर्भाचा विकास केला. त्यावरील अन्याय दूर केला, अनुशेष भरुन काढला असा केलेला दावा किती फोल होता, हे सांगता आले नाही. विदर्भाचा विकास साधत केवळ नागपूरवरच भर होता. तरी देखील नागपूर जिल्हयातील बारापैकी पाच ठिकाणी काँग्रेसचा विजय झाला. गत निवडणूकीत बारापैकी अकरा जागा महायुती जिंकल्या होत्या.

भाजपकडे नेतृत्व, संघटन आणि आर्थिक ताकद मोठी असतानादेखील काँग्रेसने झेप घेण्याचा जो प्रयत्न केला व जे मर्यादित यश मिळवले, त्यामुळे काँग्रेसमध्ये प्राण संचारलेत. नागपूरसारख्या जिल्हयात, जिथे जिल्हा परिषद व महापालिकेची सत्ता, खासदार आणि बारापैकी ११ आमदार भाजपचे होते, तिथे काँग्रेसने सहा जागा मिळवून मारलेली मुसंडी आणि मुख्यमंत्र्यांसह भाजपच्या उमेदवारांशी दिलेली लढत लक्षणीय आहे.

**वैदर्भीय मतदारांचा भाजपला जोरदार धक्का**

गेल्या वेळी भाजपच्या पारडयात भरभरून मतांचे दान टाकणाऱ्या वैदर्भीय मतदारांनी या वेळी मात्र भाजपला जोरदार झटका दिला आहे. मतदारांचा हा कौल भाजपच्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. मोठा जनाधार असलेल्या नितीन गडकरींना बाजूला सारणे, तेली तसेच ओबीसी समाजाची नाराजी भाजपला भोवल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. काँग्रेसला विदर्भात कमी जागा मिळाल्या असल्या तरी या पक्षाच्या मतांमध्ये भरघोस वाढ झाली आहे. काँग्रेसने ही निवडणूक थोडी गांभीर्याने घेतली असती तर चित्र आणखी वेगळे दिसले असते.

| २०१४ | | २०१९ |
|---|---|---|
| ४४ | भाजप | २९ |
| ०४ | शिवसेना | ०४ |
| १० | काँग्रेस | १५ |
| ०१ | राष्ट्रवादी | ०६ |
| ०३ | इतर | ०८ |
| | **एकूण** | **६२** |

राज्यातील सत्ता स्थापनेचा मार्ग विदर्भातून जातो ही उक्ती सार्थ ठरवत भाजपने गेल्या वेळी विदर्भातून ६२ पैकी ४४ जागा स्वतंत्रपणे लढून जिंकल्या होत्या. या वेळी युती पन्नासचा आकडा गाठेल, असा दावा भाजपकडून सातत्याने केला जात होता. जनतेने तो फोल ठरवला आहे. भाजपला येथे निम्म्या जागासुद्धा जिंकता आल्या नाहीत. नागपूर जिल्हा हा भाजपचा गड म्हणून ओळखला जातो. या वेळी काँग्रेसने या गडालाच सुरुंग लावला आहे. शहरातील दोन जागा काँग्रेसने हिसकावल्या, तर नागपूर ग्रामीणमध्ये भाजपची पार वाताहत झाली. खुद्द मुख्यमंत्र्यांना त्यांच्या मतदारसंघात गेल्या वेळचे मताधिक्य राखता आले नाही. ग्रामीणचे नेतृत्व करणारे चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी नाकारणे भाजपला चांगलेच महागात पडले. भंडारा—गोंदियाची जबाबदारी नागपूरच्या परिणय फुकेंकडे देणे ही घोडचूक होती, हे तेथील निकालातून दिसून आले. गडचिरोलीत भाजपने बऱ्यापैकी यश मिळवले पण सुधीर मुनगंटीवारांच्या चंद्रपुरात भाजपला मोठा फटका बसला. गेली अनेक वर्षे काँग्रेसचा गड असलेल्या यवतमाळात भाजपने गेल्या वेळी निर्भेळ यश मिळवले होते. या वेळी काँग्रेसने तेथे पुन्हा वर्चस्व

प्रस्थापित केले आहे. राज्यमंत्री मदन येरावार यांचा निसटता विजय झाला आहे. वर्ध्यात गेल्या वेळचेच उमेदवार रिंगणात होते. तेथे काँग्रेसची कामगिरी ढेपाळली. अमरावतीत या वेळी काँग्रेसने अधिक जागा जिंकत युतीला धक्का दिला आहे. प्रहारचे बच्चू कडू यांनी मेळघाटमध्ये पक्षाला विजय मिळवून देत प्रहार संघटनेला बळकटी दिली. गेल्या पाच वर्षांत भाजपने विदर्भात विकास कामे करताना वऱ्हाडाकडे कमालीचे दुर्लक्ष केले. त्याचा फटका अमरावतीत बसला, पण अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यात मात्र भाजपने या वेळीसुद्धा चांगले यश मिळवले. विकासकामे व निवडणुकीतील विजय याचा फारसा संबंध नसतो, हे पश्चिम वऱ्हाडातील या यशाने दाखवून दिले. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत विदर्भात काँग्रेसला केवळ एक जागा मिळाली होती, पण पक्षांच्या मतांमध्ये प्रचंड वाढ झाली होती. हा धोका भाजपला ओळखता आला नाही. त्याचा फटका आता बसला आहे. या वेळीसुद्धा काँग्रेसने जागा कमी जिंकल्या, पण पक्षाच्या मतांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. नागपूर शहरात भाजपला काही ठिकाणी काठावर विजय मिळाला. लोकसभेच्या वेळी वंचितने काँग्रेसचे समीकरण बिघडवले होते. वंचित भाजपची 'बी टीम' आहे, असा प्रचार नंतर जोरदारपणे सुरू झाला. त्यामुळे या वेळी वंचितची जादू विदर्भात चालली नाही व भाजपच्या जागा कमी झाल्या. विदर्भात नितीन गडकरींना मानणारा मोठा वर्ग आहे. विदर्भातील भाजपवर त्यांचाच प्रभाव आहे. या वेळी गडकरींना दुय्यम स्थान दिले जात असल्याचे अनेकांच्या लक्षात आले. गडकरी समर्थक अशी ओळख असलेल्या बावनकुळेंना उमेदवारी नाकारण्याच्या घटनेकडेसुद्धा याच दृष्टिकोनातून बघितले गेले. त्याचा फटका भाजपला बसला. गडकरींनी विदर्भात भरपूर सभा घेतल्या, पण निवडणुकीची सूत्रे त्यांच्या हाती नव्हती. जनाधार यात्रेत ते नव्हते. मुख्यमंत्री फडणवीस हेच भाजपचा एकमेव चेहरा होते. मराठा आरक्षणामुळे ओबीसी व खुल्या प्रवर्गावर अन्याय झाल्याची भावना विदर्भात होती. त्यामुळे भाजपचा परंपरागत मतदार या वेळी मतदानासाठी बाहेर पडला नाही. संघपुरस्कृत 'सेव्ह मेरिट सेव्ह नेशन' हे आंदोलनसुद्धा भाजपसमोर अडचण निर्माण करणारे ठरले. दुसरीकडे मतदानासाठी नेहमी बाहेर पडणारा गरीब वर्ग काँग्रेसकडे गेल्याचे दिसून आले. विदर्भातील ग्रामीण भागात सरकारविरुद्ध रोष होता. लोकसभेच्या वेळी राष्ट्रभक्तीच्या फुग्याने तो थोपवून धरला. या वेळी मात्र त्त्किंञ्ची मात्रा चालली नाही व हा वर्ग विरोधकांकडे वळता झाला. विदर्भाकडे सर्वाधिक लक्ष देऊन तसेच विकासकामांचा झंझावात निर्माण करूनसुद्धा भाजपला मोठा फटका या निकालाने दिला आहे.

**विदर्भाने आयाराम – गयारामांना नाकारले**

विदर्भातील जनतेने यावेळी आयाराम—गयारामांना सुद्धा नाकारले. गोंदियाचे काँग्रेसचे आमदार गोपाल अग्रवाल अगदी शेवटच्या क्षणी भाजपमध्ये गेले. त्यांचा पराभव भाजपच्या जिल्हाध्यक्षाने बंडखोरी करून केला. राष्ट्रवादीचे वर्ध्यातील नेते सुरेश देशमुख यांचे चिरंजीव समीर शिवसेनेकडून देवळीत लढले. त्यांचाही पराभव झाला. राष्ट्रवादीचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष संदीप गड्डमवार ऐनवेळी मुख्यमंत्र्यांच्या निर्देशावरून शिवसेनेत दाखल झाले. काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरीत त्यांचा पराभव केला. गेल्यावेळी ऐन निवडणुकीच्या वेळी भाजपमध्ये गेलेले वरोराचे संजय देवतळे यावेळी मुख्यमंत्र्यांच्याच सांगण्यावरून शिवसेनेत गेले. काँग्रेसचे राज्यातील एकमेव खासदार बाळू धानोरकर यांच्या पत्नी व काँग्रेसच्या उमेदवार प्रतिभा यांनी देवतळेंचा भद्रावती—वरोरा मतदारसंघात पराभव केला.

### मुख्यमंत्र्यांचे मताधिक्य घटले


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातील दक्षिण—पश्चिम विधानसभा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा विजय मिळवला आहे. मात्र, मुख्यमंत्री म्हणून वलय असतानाही २०१४ च्या तुलनेत त्यांचे मताधिक्य आठ हजारांहून अधिक मतांनी कमी झाले आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वात ही निवडणूक भाजपने लढवली. राज्यभर त्यांनी 'महाजनादेश यात्रा' काढली आणि 'पुन्हा आणूया आपले सरकार' अशी घोषणा दिली. मात्र, त्यांनाच मतदारांनी गेल्या वेळपेक्षा कमी मते मिळाली आहेत.

### पवारांची जादू विदर्भातही

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचा करिष्मा विदर्भातही दिसून आला. गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी विदर्भात दुय्यम भूमिकेत वावरत आला आहे. यावेळीसुध्दा या पक्षाने विदर्भात केवळ १२ जागा लढवल्या होत्या त्यापैकी ६ जागा जिंकल्या. गेल्यावेळी या पक्षाला केवळ १ जागा मिळाली होती. ऐन प्रचाराच्या काळात सरकारने राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्याविरुध्द ईडीचे शुक्लकाष्ठ लावले. त्याला तोंड देत पटेलांनी भंडारा व गोंदिया या त्यांच्या गृह जिल्हयात उल्लेखनिय यश मिळवले.

- काँग्रेसने नागपूर या भाजपच्या गडालाच सुरुंग लावला, शहरातील दोन जागा काँग्रेसने हिसकावल्या, तर नागपूर ग्रामीणमध्ये भाजपची पार वाताहत झाली.
- ग्रामीणचे नेतृत्व करणारे चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी नाकारणे भाजपला चांगलेच महागात पडली.
- भंडारा—गोंदियाची जबाबदारी नागपूरच्या परिणय फुकेंकडे देणे ही घोडचूक होती, हे निकालातून स्पष्ट झाले.
- अनेक वर्षे काँग्रेसचा गड असलेल्या यवतमाळात भाजपने गेल्या वेळी निर्भेळ यश मिळवले होते. या वेळी काँग्रेसचे वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केले.
- गडचिरोलीत भाजपने बऱ्यापैकी यश मिळवले, पण मुनगंटीवारांच्या चंद्रपुरात भाजपला मोठा फटका बसला.
- वर्ध्यात गेल्या वेळचेच उमेदवार रिंगणात असल्याने काँग्रेसची कामगिरी ढेपाळली.
- अमरावतीत या वेळी काँग्रेसचा अधिक जागा जिंकत युतीला धक्का दिला.
- दलित व बहुजन मतदार हा काँग्रेसचा विदर्भातील आधार होता. गेली दहा वर्षे पक्षापासून दुरावलेला हा मतदार या वेळी काँग्रेसकडे वळला.
- विदर्भातील ६२ पैकी २९ जागांवर भाजपाचे तर ४ जागांवर शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले. आघाडीने मात्र जास्तीच्या १० जागा पटकावल्या.
- स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा यावेळीही बाजुलाच पडला त्याचा फटका बसला.
- राष्ट्रवादीला कधी नव्हे एवढे यश यावेळी मिळाले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पवारांना त्यांचे स्वकीय सोडून गेले. त्यापाई मिळालेली सहानुभूती यावेही राष्ट्रवादीच्या कामी आली.
- भाजपने यावेळी प्रादेशिक विकासाच्या मुद्यांना बगल देऊन मतदारांची नाराजी ओढवून घेतली.

- भाजप, सेनेत मोठया प्रमाणात झालेली बंडखोरी युतीला नडली. आघाडीला त्यामानाने बंडाचा फटका कमी बसला.
- वंचित आणि मनसे यांना यावेळीही मतदारांनी वंचितच ठेवले. याउलट अपक्षांच्या आकडा वाढला. अर्थात यात बंडखोरांनी हातभार लावला.
- यावेळी युती आघाडीतील रुसवे—फुगवे चव्हाटयावर आले.
- अनेक दिग्गज, काही मंत्र्यांनाही पराभव पत्करावा लागला.
- ६२ पैकी केवळ दोनच महिला (३ टक्के) निवडून आल्या.
- संघाच्या मुख्यालयात भाजपला फटका बसला.




संदर्भ


१. दै.सकाळ, २५ ऑक्टोबर २०१९.
२. दै.सकाळ, २६ ऑक्टोबर २०१९.
३. दै.महाराष्ट्र टाइम्स, २५ ऑक्टोबर २०१९.
४. दै.महाराष्ट्र टाइम्स, २७ ऑक्टोबर २०१९.
५. दै.लोकमत, २५ ऑक्टोबर २०१९.
६. दै.लोकमत, २७ ऑक्टोबर २०१९.
७. दै.लोकसत्ता, २७ ऑक्टोंबर २०१९.